# मुकुल माधव फाउंडेशनचे सेरेब्रल पाल्सीग्रस्त विद्यार्थ्यांना सहकार्य

**पुणे :** मुकुल माधव फाउंडेशनने (एमएमएफ) फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या सहकार्याने व बायसिकल एंजेल्स या ना–नफा तत्त्वावरील सामाजिक उपक्रमासह पुणे ते रत्नागिरी या सायक्लॉथॉनचे आयोजन केले असून समाजातील दुर्बल घटकांना मदत करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

हा कार्यक्रम मुकुल माधव फाउंडेशनचा एक उपक्रम असून फिनोलेक्स पाईपने आपल्या सीएसआर उपक्रमाअंतर्गत तो प्रायोजित केला आहे आणि अशोक लेलँड हे त्याचे ट्रॅव्हल पार्टनर असणार आहेत.

शिरवळ आणि उंब्रज येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये ११११ मुलांची तपासणी करण्यात आली. ११ व १२ डिसेंबरला पाली येथील जिल्हा परिषद शाळेत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये १८०० मुलांची तपासणी करण्यात येणार आहे.